दावा दाखल ता— ०९/०६/२००८
दावा नोंदणी ता— ०९/०६/२००८
दावा निकाल ता—०१/११/२०१२
एकुण कालावधी — दि. म. व.

**<u>पाटोदा येथील सह दिवाणी न्यायाधीश ,क.स्तर .यांचे न्यायालयात</u>**

(न्यायासन — श्री. के.के.घुले )

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२५/०८</u> <u>प्रदर्श्य क्रं.</u>

१. सोपान नामदेव गर्जे,
वय—६८ वर्षे, धंदा—वकीली/शेती,
रा. महासांगवी
ह.मु. ३९४ शिवाजी नगर केडगाव, अहमदनगर.

... <u>वादी</u>

<u>विरूध्द</u>

१. मुक्ताजी तात्या गर्जे,
वय — ५८ वर्ष, धंदा—शेती,

२. मुक्ताबाई मनोहर गर्जे,
वय— ५० वर्ष, धंदा—शेती,

३. प्रमिला बाळासाहेब गर्जे,
वय— ५० वर्ष, धंदा—शेती,
रा. प्लॉट नं. २६९ सेक्टर नं. २६ समर्थ नगर
सुभम पार्कजवळ, प्राधीकरण निगडी पूणे ४४.

४. मनोहर नामदेव गर्जे (मयत)

४— ब. महादेव मनोहर गर्जे,

वय २१ वर्षे

४— क. शहादेव मनोहर गर्जे,

वय १९ वर्षे

सर्वाचा धंदा शेती, रा. महासांगवी,

ता. पाटोदा, जि. बीड.

५. बाळासाहेब नामदेव गर्जे

वय— ५५ वर्ष, धंदा—नोकरी,

रा. प्लॉट नं. २६९, सेक्टर नं. २६,

समर्थनगर सुभम पार्कजवळ,

प्राधीकरण निगडी पूर्ण ४४.

६. समिंद्रा तात्या गर्जे,

वय ६५ वर्षे,धंदा—शेती,

७. शिवाजी तात्या गर्जे

वय ५५ वर्षे, धंदा शेती.

१,२,४,६ व ७ रा. महासांगवी, ता.पाटोदा, जि. बीड.

८. लोचनाबाई माणिक नागरगोजे

वय ५० वर्षे, धंदा—शेती,

रा. सावरगाव, ता. पाटोदा, जि. बीड.

९. इंदूबाई सोपान राख

वय ४५ वर्षे धंदा शेती,

रा. थेरला, ता. पाटोदा, जि. बीड.

१०. पोपट श्रीधर नागरगोजे,

वय ५० वर्षे, धंदा शेती.

रा. पो. कॉ. वरली पोलीस स्टेशन मुंबई.

११. सुरेश श्रीधर नागरगोजे

वय ४० वर्षे, धंदा शेती,

रा. वडगाव, ता. भुम, जि. उस्मानाबाद.

१३. फुलबाई केशव गर्जे,

वय ६५ वर्षे, धंदा—शेती,

१४. विलास केशव गर्जे

वय ५० वर्षे धंदा शेती,

१५. छगन केशव गर्जे,

वय ४५वर्ष, धंदा—शेती,

१६. विक्रम केशव गर्जे

वय सज्ञान, धंदा—शेती,

१७ नन्दुबाई बाबासाहेब गर्जे,

वय सज्ञान, धंदा—शेती,

१८. विठठल बाबासाहेब गर्जे

वय अज्ञान, धंदा शेती.

१९. रमेश बाबासाहेब गर्जे,

वय अज्ञान धंदा—शेती.

२०. मैना बाबासाहेब गर्जे,

वय अज्ञान धंदा शेती.

प्रतिवादी कं. १७ जनक आई म्हणून अ.पा.क. प्रतिवादी कं १८ ते २० करीता प्रतिवादी कं १३ ते २०. रा. महासांगवी, ता. पाटोदा, जि. बीड..

२१. हारीबाई नामदेव गर्जे

वय ८० वर्षे, धंदा—घरकाम,
रा. महासांगवी, ता. पाटोदउ, जि. बीड.

२२. केशर संभु जायभाये
वय सज्ञान, रा. जायभायेवाडी,
ता. जामखेड, जि. अहमदनगर.

२३. झुंबर सोनबा सानप
वय ३२ वर्षे, धंदा—शेती,
रा. सौताडा, ता. पाटोदा, जी. बीड. ..प्रतिवादी

**दावा:** वादग्रस्त मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून स्वतंत्र ताबा मिळणेबाबत.

**उपस्थित सन्माननीय विधिज्ञ—**

१. श्री. एस. डी. देशमुख वादी तर्फे सन्माननीय विधिज्ञ.

२. श्री. ए.एम. जगदाळे, प्रतिवादीं क्रं. १८ ते २० तर्फे सन्मानीय विधिज्ञ.

## न्यायनिर्णय

(दि. ०१ नोव्हेंबर २०१२ रोजी जाहीर केला)

१. वादीने प्रस्तुतचा दावा मौजे पाटोदा येथील सर्व्हे नं. ६५८/अ मधील ६ एकर ७ गुंठे जमीनीचे सरस निरस मानाने वाटप होवून वेगळा हिस्सा मिळण्याकरिता दाखल केला आहे. (सदर जमीनीचा पुढे

वादग्रस्त मिळकत असा उल्लेख करण्यात येतो.)

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.

वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक दाजी गर्जे हा होता त्याची वंशावळ दाव्यासोबत जोडण्यात आलेली आहे. सदर वंशावळीवरून वादी प्रतिवादींचे नाते पुढीलप्रमाणे आहेत. त्यानुसार वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक दार्जी गर्जे हा मयत असून त्याला दोन मुले नाना गर्जे व तात्या गर्जे ही होती. सदर दोघेही मुले मयत आहेत. मयत नाना गर्जे यांना तीन मुले होती त्यांची नावे नामदेव, विठ्ठल व केशव होती. मयत नानाची सदर तीन मुलेदेखील मयत आहेत. मयत नामदेव यांना तीन मुले व तीन मुली आहेत. मयत नामदेव यांचे वारस वादी सोपान, मयत प्रतिवादी क्रं ४ मनोहर (त्याचे वारस प्रतिवादी क्रं ४—अ, ४—ब आणि ४—क), प्रतिवादी क्रं.५ बाळासाहेब व पत्नी हिराबाई प्रतिवादी क्रं २१ हे आहेत. मयत नाना गर्जे यांचा दुसरा मयत मुलगा विठ्ठल याला कोणीही वारस नाही. मयत नाना गर्जे यांचा तीसरा मुलगा मयत केशव याला प्रतिवादी क्रं १३ फुलाबाई (पत्नी), प्रतिवादी क्रं १४ विलास (मुलगा), प्रतिवादी क्रं १५ छगन (मुलगा), प्रतिवादी क्रं १६ विक्रम ( मुलगा,) प्रतिवादी २२ केशर (मुलगी), झुंबर (मुलगी) प्रतिवादी क्रं १७ नंदु बाबासाहेब (सुन) व प्रतिवादी क्रं १८ ते २० नातवंड असे वारस

आहेत.

३. मुळ मालक मयत दाजी गर्जे यांचा दुसरा मुलगा मयत तात्या याला प्रतिवादी क्रं १ मुक्ताजी(मुलगा), प्रतिवादी क्रं ७ शिवाजी (मुलगा) प्रतिवादी क्रं ८ सुलोचना (मुलगी) प्रतिवादी क्रं ९ इंदुबाई (मुलगी) व प्रतिवादी क्रं ६ समींद्राबाई (पत्नी) असे वारस आहेत.

४. वादीच्या कथनाप्रमाणे वादग्रस्त मिळकत ही वादी सोपान व त्याचे दोन भाउ मयत मनोहर व बाळासाहेब यांच्या हिश्श्याला आलेली होती व आहे व वादग्रस्त मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जा व वहिवाटीमध्ये होती व आहे. वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक दाजी गर्जे हा कुटूंबकर्ता असल्यामुळे त्याच्या नंतर वादग्रस्त मिळकतीस तात्या दाजी गर्जे व त्यांच्या नंतर मुक्ताजी तात्या गर्जे (प्रतिवादी क्रं १) यांची नावे कुटूंबाकर्ता म्हणून वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ ला लागली. त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्रं १ याने प्रतिवादी मुक्ताबाई मनोहर व प्रमिलाबाई यांना दि. १३/१०/२००० रोजी वादीच्या संमतीशिवाय फेरफार क्रं ६६८० ने १००/—रूपयांच्या स्टॅम्पवर त्या सुना आहेत असे खोटे दर्शवून वादग्रस्त मिळकतीपैकी १ हेक्टर २० गुंठे जमीन वाटप करून दिली. तसेच प्रतिवादी क्रं १ ने दि.

१९/०८/१९९८ रोजी वादग्रस्त मिळतिपैकी ६० गुंठे जमीन खरेदीखत क्रं १३३१ ने प्रतिवादी प्रमिला बाळासाहेब हिला खरेदी दिली त्यानुसार फेफार क्रं ६५४१ अन्वये प्रतिवादी प्रमिलाच्या नावाची ७/१२ ला नोंद झाली. तसेच प्रतिवादी क्रं १ ने दि. १९/०८/१९९८ रोजी खरेदीखत क्रं १३३० अन्वये वादग्रस्त मिळकतीपैकी ६० आर जमीन प्रतिवादी मुक्ताबाई मनोहर हिला खरेदी दिली त्यानुसार फेरफार क्रं ६५४० अन्वये ७/१२ रेकॉर्डला तीचे नावाची नोंद झझल. प्रतिवादी क्रं १ ने प्रतिवादी क्रं २ मुक्ताबाई व प्रतिवादी क्रं ३ प्रमिला यांच्या हक्कात करून दिलेले वाटपपत्र व खरेदीखत हे पोकळीस्तव व बेकायदेशीररीत्या वादीच्या संमतीशिवाय करण्यात आलेले असल्यामुळे ते वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही.

५. वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्ड पाहिल्यानंतर वादीने प्रतिवादीकडे त्याचा १/३ हिस्सा वाटप करून मागितला होता प्रतिवादीने त्यास टाळाटाळ केली शेवटी प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून हिस्सा देण्यास स्पष्ट नकार दिल्यामुळे वादीने प्रस्तुतचा वाटपाचा दावा दाखल केला आहे.

६. प्रतिवादींना दाव्याचे समन्स बजावणी होवून प्रतिवादी क्रं २, ४,

१७, व २१ हे हजर झाले परंतु त्यांनी पुरेशी संधी असून सुध्दा कायदेशीर मुदतीमध्ये त्यांचे लेखी म्हणणे न्यायालयात सादर केले नाही त्यामुळे दावा त्यांच्याविरूध्द विना लेखी कैफियत चालविण्यात आला. प्रतिवादी क्रं १, ३, ५ ते १६, २२, २३, ४—ब, ४—क हे समन्स बजावणी होवूनदेखील न्यायालयात हजर झाले नाहीत.त्यामुळे त्यांच्याविरूध्द प्रस्तुतचा दावा एकतर्फा चालविण्यात आला. प्रतिवादी क्रं १८ ते २० हे अज्ञान आहेत. त्यांची अज्ञान पालन कर्ती प्रतिवादी कं १७ हिने प्रतिवादी क्रं १८ ते २० यांच्यातर्फे लेखी महणणे दाखल केले नाही. त्यमुळे नि. क्रं. ५८ वरील अर्जानुसार दि. १६/०६/११ रोजी प्रतिवादी क्रं १८ ते २० यांच्यातर्फे दावा चालविण्यासाठी दिवाणी न्यायालय क.स्तर पाटोदा येथील नाझर यांची अज्ञान पालन कर्ता महणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार प्रतिवादी क्रं १८ ते २० यांच्यातर्फे नि.क्रं. ७१ वर लेखी कैफियत दाखल करण्यात आली.

७. प्रतिवादी क्रं १८ ते २० यांनी वादग्रस्त मिळकतीचे वर्णन व वादी व प्रतिवादीमधील असेलले नातेसंबंध मान्य कले व इतर सर्व वादीचे कथने स्पष्ट नाकारली आहेत. प्रतिवादी क्रं १८ ते २० यांच्या कथनाप्रमाणे वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक तात्या दाजी गर्जे हा होता त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा मुक्ताजी तात्या गर्जे(प्रतिवादी क्रं १) वादग्रस्त मिळकतीचा

मालक व कब्जेदार झाला. फोरफार क्रं ५६८०, ६५४० आणि ६५४१ हे कायदेशीर असून वादीवर बंधनकारक आहे. शेवटी प्रतिवादी क्रं १८ ते २० यांनी कथन केले की ते प्रतिवादी क्रं १ यांच्या वंशावळीत हिस्सेदार असल्यामुळे केवळ त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन दाव्यात समाविष्ट केले आहे. प्रतिवादी क्रं १८ ते २० यांनी वादीचा दावा खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

८. दोन्ही पक्षांच्या कथनावरून नि. क्रं. ७३ मुद्दे निश्चित करण्यात आले सदरचे मुद्दे परत चर्चेस घेवून त्यावर निष्कर्ष व कारणीमिमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

**मुद्दे** **निष्कर्ष**

| | | |
|---|---|---|
| १ | वदीने सिध्द केले आहे का की वादग्रस्त मिळकत ही वादी प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत आहे. | होय |
| २ | वदी वादग्रस्त मिळक्तीमध्ये वाटपादवारे समान हिस्सा मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास प्रत्येकी पक्षाकारांचे हिस्से किती? | होय |
| ३ | कोणता आदेश आणि हुकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणीमिमांसा**

९.        वादी, प्रतिवादी क्रं. १८ ते २० यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

१०.        प्रस्तुत प्रकरणात वादी तर्फे सा.क्रं १ म्हणुन त्याचे स्वत:चे पुराव्यादाखल शपथपत्र नि.क्रं.. ७४ वर दाखल करण्यात आले आहे वादीतर्फे अधिक पुरावा देणे नसल्याबाबत नि.क्रं. ७६ वर पुरसिस देण्यात आली. तसेच खालील कागदोपत्री पुरावा वादीने दाखल केला आहे.

१. मौजे पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड येथील सर्व्हे क्रं. ६५८/अ चा ७/१२ चा उतारा नि. क्रं. ६.

२. फेरफार क्रं ६६८० ची सत्यप्रत नि. ७.

प्रतिवादी क्रं. १८ ते २० तर्फे नि.क्रं. ७७ वर पुरावा देणे नसल्याबाबत पुरसिस देण्यात आली.

**मुद्दा क्रं १ संदर्भी**

११.        वादी व प्रतिवादीमध्ये असलेले नातेसबंधाबात कोणताही वाद नाही. त्याचप्रमाणे वादग्रस्त मिळकतीच्या वर्णनाबाबत देखील कोणताही वाद नाही. वादीने त्याचे नि. क्रं. ७४ मधील पुराव्याच्या शपथपत्रामध्ये

वाटपपत्रामधील सर्व कथनांचे पुर्नविवेचन केलेले आहे. त्याच्या पुराव्यानुसार वादग्रस्त मिळकत ही वादी व त्याचे दोन भाउ मनोहर नामदेव व बाळासाहेब नामदेव यांच्या हिश्श्यास वाटपामध्ये आलेली आहे. तसेच वादग्रस्त मिळकतीवर त्यांचा प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट आहे. परंतु वादी व्यवसायानिमित्त नगर येथे स्थाईक झालेले असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी कं १ मुक्ताजी याने प्रतिवादी मुक्ताबाई व प्रमिला यांना दि. १३/१०/२००० रोजी वादीच्या संमतीशिवाय फेरफार कं ६६८० ने १००/—रूपयांच्या स्टॅम्पवर वाटपपत्र करून दिले. त्यावेळी प्रतिवादी कं १ ने प्रतिवादी कं २ मुक्ताबाई व प्रतिवादी कं ३ प्रमिला या त्यांच्या सुना असल्याचे खोटे दर्शवून वादग्रस्त मिळकतीपैकी १ हेक्टर २७ आर जमीन त्यांना वाटप करून दिली. वादीच्या या कथनाच्या पृष्टर्थ त्याने वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ नि. कं. ६ फेफार कं ६६८० नि. कं. ७ दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे सिून येते की वादग्रस्त मिळकतीवर प्रतिवादी कं १ ते ३ यांची नावे नोंदविलेली आहेत. वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्डला प्रतिवादी कं १ चे नाव त्याचे वडील तात्या दाजी गर्जे यांच्या मृत्युनंतर नोंदविण्यात आल्याचेदेखील दिसून येते. तसेच वादग्रस्त मिळकतीपैकी १ हेक्टर २७ गुंठे जमीन प्रतिवादी कं १ ने प्रतिवादी कं २ व ३ यांना वाटप करून दिल्याचेदेखील स्पष्ट होते.

१२. वादीच्या पुराव्यानुसार प्रतिवादी क्रं १ ने दि. १९/०८/१९९८ रोजी खरेदीखत क्रं १३३१ व १३३० अन्वये प्रतिवादी प्रमिला बाळासाहेब व प्रतिवादी मुक्ताबाई मनोहर यांना वादग्रस्त मिळकतीपैकी प्रत्येकी ६० आर जमीन खरेदी दिलेली आहे व फेरफार क्रं ६५४१ व ६५४० अन्वये प्रतिवादी क्रं २ व ३ यांच्या नावे वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्डला नोंदविण्यात आले आहे.

१३. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं १ ते ३ यांनी हजर होवून वादीच्या कथनानां आव्हान दिलेले नाही. त्यामाळे वादीचा पुरावा अबाधीत राहिलेला आहे. त्यामुळे वादीची कथने ही प्रतिवादी क्रं १८ ते २० व्यतिरिक्त इतर प्रतिवादींना मान्य असल्याचे गृहित धरावे लागेल. प्रतिवादी क्रं. १८ ते २० तर्फे वादीचा उलटतपास घेण्यात आला परंतु त्यामध्ये वादीच्या पुराव्याची विश्वास अर्हता कमी होत नाही.

१४. वादीचा पुरावा व प्रकरणात दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी

कं १ च्या नावे एकत्र कुटूंब कर्ता म्हणून ७/१२ ला नोंदविण्यात आले आहे. यावरून वादग्रस्त मिळकत ही वादी प्रतिवादींची एकत्र हिंदू कुटूंबाची मिळकत असल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे प्रतिवादी कं १ ने प्रतिवादी कं २ व ३ यांना वादग्रस्त मिळकतीपैकी १ हेक्टर २७ गुंठे जमीन वाटपाआधारे दिलेले असल्यामुळेदेखील वादग्रस्त मिळकत ही एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याचे दिसून येते. अन्यथा प्रतिवादी कं १ ने वादग्रस्त मिळकत प्रतिवादी कं. २ व ३ यांना वाटून देण्याचे संयुक्तीक कारण नाही. सदरचा झालेल्या वाटपामध्ये वादीस त्याचा कायदेशीर हिस्सा देण्यात आलेला नाही त्यामुळे प्रतिवादी कं १ याला वादग्रस्त मिळकत प्रतिवादी कं २ व ३ यांना वाटून देण्याचा अथवा विक्री करण्यचा कुठलाही कायदेशीर अधिकार नव्हता हे स्पष्ट दिसते.

१५. महसुल अभिलेखामध्ये झालेल्या नोंदी हया तदर्थ म्हणजे केवळ शेत जमीनीवरील सारा वसुलण्याकरिता केलेल्या असतात त्यामुळे महसुल रेकॉर्डवर असलेल्या नोंदीमुळे मालकी हक्क पारीत होत नाही. या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक वाटते की नि. कं. ६ वरील वादग्रस्त मिळकतीच्या उता—यावरून प्रतिवादी कं १ चे नाव सदर हिंदु एकत्र कुटूंबकर्ता म्हणून वादग्रस्त मिळकतीस असल्याच्या हद्दीपर्यत मान्य करता येईल परंतु त्यांना प्रतिवादी कं २ व ३ यांच्या हक्कात केलेले वाटणीपत्र व

खरेदीखत हे वादीच्या संमतीशिवाय झालेले असल्यामुळे ते मान्य करता येणार नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने महसुल अभिलेखात झालेले फेरफार क्रं. ५६८०, ६५४०, ६५४१ हे वादीवर बंधनकारक नाही.

१६. कायदयाच्या प्रस्तापीत तत्वानुसार हिंदू एकत्र कुटूंबाबाबत गृहीतक आहे. परंतु सदरचे गृहीतक हे हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकतीबाबत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादीने दिलेला पुरावा वादग्रस्त मिळकत एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याचे स्पष्ट करतो. त्याचप्रमाणे वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक मयत दाजी गर्जे असल्याबाबत कोणताही वाद नाही. सदर दाजी गर्जे हे मयत झाल्यानंतर कुटूंबकर्ता म्हणून महसुली अभिलेखात त्यांचा मुलगा तात्या गर्जे याचे नावे नोंदविण्यात आले व त्याच्यानंतर प्रतिवादी क्रं १ चे नाव वादग्रस्त मिळकतीच्यामहसुली अभिलेखात कुटूंबकर्ता महणून नोंदविण्यात आलेले आहे. यावरून वादग्रस्त मिळकत ही वादी प्रतिवादीच्या एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याचे सिध्द होते व प्रतिवादी क्रं १ चे नाव संपूर्ण कुटूंबातील सदस्याच्या वतीने कुटूंबकर्ता म्हणून नोंदविलेले असल्याचेदेखील सिध्द होते. त्यमाुळे मुद्दा क्रं. १ चे उत्तर होय असे देत आहे.

**<u>मुद्दा कं २ संदर्भी</u>**

१७. वर चर्चिल्याप्रमाणे वादी प्रतिवादी यांच्यातील नातेसबंधाबाबत कोणताही वाद नाही. त्याचप्रमाणे वादग्रस्त मिळकत ही वादी प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत आहे हे देखील सिध्द झालेले आहे. त्यामुळे वादी, प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटूंबाचे सदस्य (सहदायक) असल्यामुळे त्यांना वाटपाद्वारे समान हिस्सा मिळण्याचा निश्चितपण अधिकार आहे. त्यामुळे वादीला वादग्रस्त मिळकतीमध्ये त्याचा कायदेशीर हिस्सा मिळण्याचा अधिकार आहे. या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक वाटते की वादग्रस्त मिळकत वादी व त्याचे दोन भाउ मनोहर व बाळासाहेब त्यांच्या हिश्श्यास आल्याबात कुठलाही पुरावा दाखल नाही. तसेच महसुल अभिलेखाच्या नोंदीवरून असे दिसते की वादग्रस्त जमिन वादी प्रतिवादींच्या कुटूंबाची एकत्रीत आहे. त्यामुळे मुद्दा कं २ चे उत्तर देखील होय असे देत आहे.

**<u>मुद्दा कं ३ संदर्भी</u>**

१८. वादीने वादग्रस्त मिळकत ही एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याचे सिध्द केले आहे. त्यामुळे वादी प्रतिवादींचे पुढीलप्रमाणे कायदेशीर हिस्से आहेत. वादी हा वादग्रस्त मिळकतीमध्ये <u>१/२०</u> हिस्सा मिळण्यास पात्र

आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्रं ५ व २१ यांचा वादग्रस्त मिळकतीमध्ये १/२० इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्रं २—ब व क यांना प्रत्येकी १/६० इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्रं, १,६,७,८,९ यांचा वादग्रस्त मिळकतीमध्ये प्रत्येकी १/१० इतका हिस्सा आहे. प्रतिवादी क्रं १३ ते १६, २२ व २३ हे वादग्रस्त मिळकतीमध्ये १/२८ इतका हिस्सा मिळण्यास पात्र आहेत. प्रतिवादी क्रं १० ते १२ यांचा वादग्रस्त मिळकतीमध्ये १/६० इतका हिस्सा आहे व अज्ञान प्रतिवादी क्रं १८ ते २० व १७ यांचा वादग्रस्त मिळकतीमध्ये १/११२ इतका हिस्सा आहे. वादी प्रतिवादी यांचा वादग्रस्त मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा असल्यमुळे खालील न्यायोचीत आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ वादीचा दावा मंजुर करण्यात येतो.

२ वादग्रस्त मिळकतींमध्ये वाटपाद्वारे वादीस १/२० हिस्सा, प्रतिवादी क्रं ५ ते २१ यांना प्रत्येकी १/२०हिस्सा, प्रतिवादी कं २,४—ब व ४—क यांना प्रत्येकी १/६० हिस्सा, प्रतिवादी क्रं १, ६ ते ९ यांना प्रत्येकी १/१० हिस्सा, प्रतिवादी क्रं १३ ते १६, २२ व २३ यांना प्रत्येकी १/२८ हिस्सा, प्रतिवादी क्रं १० ते १२ यांना प्रत्येकी १/६० हिस्सा, प्रतिवादी क्रं १७ ते २० यांना प्रत्येकी १/११२ हिस्सा ताब्यात देण्यात यावा.

३ तसा प्राथमिक हुकूमनामा जिल्हा अधिका—यांकडे वरीलप्रमाणे वाटप करण्यासाठी दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ५४ अन्वये पाठविण्यात यावा.

४ वादी प्रतिवादींनी दाव्याचा खर्च त्यांच्या हिश्श्याप्रमाणे सोसावा.

स्वा—

दि. ०१/११/२०१२ (कि.का.घुले)
पाटोदा सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटोदा.